B.A. S.Y. (CBCS Pattern) Semester-IV

# BA12B-2 - Marathi Literature

P. Pages : 2 **GUG/S/25/12066(S)**

Time : Three Hours * 4 7 6 0 * Max. Marks : 80

---

**1.** आधुनिक कवितेचे बदलते स्वरूप 'आधुनिक मराठी कविता' या ग्रंथाच्या आधारे स्पष्ट करा. **16**

**किंवा**

केशवसुतांनी 'विद्यार्थ्याप्रत' या कवितेतून विद्यार्थ्याचे अनन्यसाधारण महत्त्व कसे विशद केले आहे?

**2.** नारायण सुर्वे यांच्या 'जाहीरनामा' या कवितेचे रसग्रहण करा. **16**

**किंवा**

स्त्रीवादी कविता म्हणून 'गावाकडल्या बायाबापडया' या कवितेचे मूल्यमापन करा.

**3.** पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील काव्यपंक्तीचे संदर्भासह अर्थ स्पष्ट करा. **16**

**गट 'अ'**

क) "खादाड असे माझी भूक,
चतकोराने मला न सूख;
कूपांतिल मी नच मंडूक;
मळ्यास माझ्या कुंपण पडणें अगदीं मला न साहे !
कोण मला वठणीला आणूं शकतो तें मी पाहें !"

ख) "यंत्रयुगांतील नवनृत्याचा
स्थानुभाव हा प्रगटे येथे
मनोज्ञ मुद्रा शिल्पित एक
संगमरवरी मांसामध्ये."

ग) "तो-सौराज आला; गांधीवाला
रहम फरमाया अल्ला
खूप जुलूस मनवला
चालवालोने तेरे बापूने –
तेरा बापू; चालका भोंपू.."

घ) "ढोल म्हणजे जंगलाची प्रार्थना,
दारू म्हणजे कुलाचार
कर्ज म्हणजे निसर्ग,
निसर्गाला बदलायचे म्हणजे किती मोठं पाप?"

**किंवा**

**गट 'आ'**

च) "दाने भरता कन्सात येती हुशार पाखरं
भर हंगामात अशा होते पारखी भाकरं
ताहा पोटातली आग पेट घेते आंगभर
मंग सोंगेल फनाची अनी होते धारदार."

छ) “मागील पाणी गढूळ आलं
पुढल्या पाण्यानं किती जपावं
हां हां म्हणता वणवा आला
एका झाडानं किती टकरावं”

ज) “त्यानं प्रत्येक रात्री आश्वासलेला
मोगरीचा गजरा
ती मात्र भरते तिच्या जखमा
खब्दांच्या हळदीनं
खचाखच”

झ) “काय झालं सूरपारंब्या, विटीदांडू, लगोरी, भवरा,
नवरा-नवरी, डॉक्टर डॉक्टर
खेळणाऱ्या मुलाच्या भाषेचं?”

**4.** पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. **16**

**गट ‘क’**

त) “मम अर्थ काय बेंबीचा! विश्वचक्री ?” असे मर्ढेकर का म्हणतात?

थ) विठ्ठल वाघ यांना ‘वावर’ मध्ये विठ्ठलाचे दर्शन कसे झाले?

द) अभिरूची भिन्नतेची कारणे स्पष्ट करा.

ध) साहित्याच्या वर्गीकरणाची आवश्यकता विशद करा.

**किंवा**

**गट ‘ख’**

प) ‘चित्र’ या कवितेचा भावार्थ उलगडून दाखवा.

फ) तुम्ही प्रकाशाचे पुंजके व्हा! असे दया पवार का म्हणतात.

ब) अथीरूची म्हणजे काय?

भ) नाममात्रवादी सिध्दांताची चर्चा करा.

**5.** पुढील सर्व प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. **16**

1) भुजंग मेश्राम यांच्या ‘आदिमाया’ या कवितेत आदिमातेच्या कोणत्या खुणा दिसतात.

2) ‘दु:ख’ या कवितेचा आशय उलगडून दाखवा.

3) सांस्कृतिक पर्यावरण स्पष्ट करा.

4) ‘नाटक’ या साहित्यप्रकाराची वैशिष्ट्ये सांगा.

**********